**तक्रार युएलपी क्र.२०/२०२४**
**निशाणी क्रं. सी—१२**

**तक्रारदारातर्फे ॲड. श्री.बी.डी.मनोळकर यांचेमार्फत पुढील उलटतपास शपथेवर सुरु**

हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदार हे ऑगस्ट २०१६ ला रोजंदारीवर नोकरीस लागले. तक्रारदार हे सुरूवातीस मुख्य कार्यालयात अकौंट विभागात क्लर्क या पदावर कार्यरत होते. हे म्हणणे खरे आहे की, जुन २०१८ पासून त्यांची बदली पशू खाद्य कारखान्यात केली. तेथे ते १३/०१/२०२४ पर्यंत कार्यरत होते. तक्रारदार यांची दिनांक १३/०३/२०२४ च्या आदेशाने शितकरण केंद्र भोगवे येथे क्लर्क म्हणून बदली केली व ते कार्यरत आहेत.

हे म्हणणे खरे आहे की, पशूखाद्य दुध पुरवठा करणा—या संस्थेच्या मागणीप्रमाणे पुरवठा केला जातो. हे म्हणणे खरे आहे की, पशू खाद्य पुरवठा करण्याकरीता वाहतूक ठेकेदाराची नेमणूक प्रशासनाने केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, राधानगरी तालूका सहकारी वाहतूक संस्था मर्या. घोटवडे ही एक वाहतूक ठेकेदार संस्था आहे. हे म्हणणे खरे आहे की, पशू खाद्य मार्केटींग मध्ये शुभम भोसले क्लर्क म्हणून कार्यरत होते.हे म्हणणे खरे आहे की, डिलीव्हरी चलन २ ते ३ प्रतीत मार्केटींक विभागात तयार केले जाते.एक चलन गोडावून मध्ये माल भरण्याकरीता दिले जाते दुसरी प्रत संबंधीत वाहनाच्या चालकाकडे दिली जाते. तीसरी प्रत प्रशासनाकडे ठेवली जाते. हे म्हणणे खरे आहे की, संबंधीत वाहन चालक माल पोहोच झाल्याची पावती गोडावून क्लर्ककडे जमा करतो. हे म्हणणे खरे आहे की, संबंधीत संघास माल पोहोच झाल्यानंतर दर १५ दिवसांचे बिल संबंधीत संस्था संघाकडे मागणी करते. हे म्हणणे खरे आहे की, महिन्यातून दोन वाहतूक बीले जमा केली जातात. हे म्हणणे खरे आहे की,

वाहतूक बील मार्केटींक विभागातील संबंधीत क्लर्क शुभम भोसले यांच्याकडे जमा केले जात होते. हे म्हणणे खरे आहे की, शुभम भोसले हे मागणी बील, वाहतूकीचे टप्पे आणि किलोमीटरची खात्री करून संगणकावर त्याची समरी तयार करत होते. हे म्हणणे खरे आहे की, संबंधीत वाहतूकदाराची मागणी बीले आणि त्या अनुषंगीक कागदपत्रांचा ताबा शुभम भोसले यांच्याकडे होते.

वाहतूक बीले संबंधीत संस्थेस अदा करण्यापुर्वी मी मॅनेजर पशु खाद्य कारखाना म्हणून शिफारस करीत होतो. हे म्हणणे खरे आहे की, कार्यकारी संचालक यांनी सदरची बीले मंजूर केल्यानंतर संबंधीत संस्थेस अदा केली जात होती. हे म्हणणे खरे आहे की, शुभम भोसले मार्केटींक क्लर्क म्हणून ज्या कागदपत्रांच्या आधारे वाहतूक बीले तयार केली त्याच कागदपत्रांच्या आधारावर संबंधीत संस्थेस वाहतूक बीलाची रक्कम अदा केली जात होती. हे म्हणणे खरे आहे की, वाहतूक संस्थांचे ट्रक्स हे मागणीप्रमाणे वेगवेगळया संस्थांचे पशुखाद्य वाहतूक करून पोहोच करण्याचे काम करतात. हे म्हणणे खरे आहे की, पशुखाद्य वाहतूक करणा—या ट्रकचा रूट बदलल्यास टप्पा आणि किलोमीटरमध्ये बदल होवू शकतो. हे म्हणणे खरे आहे की, शुभम भोसले यांनी बदल झालेल्या रूट प्रमाणे वाहतूकीचे बील स्वत:च्या अधिकारात तयार केले होते. हे म्हणणे खरे आहे की, टप्प्यांमध्ये खाडाखोड झाली ही बाब लेखा विभागाचे अधिकारी सचिन पाटील यांच्या लक्षात आली. हे म्हणणे खरे आहे की, सचिन पाटील यांनी पहिल्यांदा मला माहिती दिली. हे म्हणणे खरे आहे की, माहिती मिळाल्यानंतर लागलीच मी राधानगरी वाहतूक संस्थेला माहिती दिली. हे म्हणणे खरे आहे की, सदरची माहिती मला दिनांक २३/०२/२०२४ रोजी मिळाली आणि त्याच दिवशी मी राधानगरी वाहतूक संस्थेच्या क्लर्कला माहिती दिली. हे म्हणणे खरे

आहे की, राधानगरी वाहतूक संस्थेच्या क्लर्कला बोलावून घेतले. हे म्हणणे खरे आहे की, संबंधीत क्लर्ककडून बीलांची दुय्यम प्रत मागून घेतली. त्याच दिवशी संघामार्फत राधानगरी वाहतूक संस्थेच्या चेअरमन यांना झालेल्या प्रकाराबद्दल माहिती दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी वरीष्ठांकडे दिनांक २३/०२/२०२४ रोजी अहवाल सादर केला होता. हे म्हणणे खरे आहे की, राधानगरी वाहतूक संस्थेला वसूली बाबत कळवले होते. हे म्हणणे खरे आहे की, आस्थापनेचे अधिकारी आणि मी शुभम भोसले याला चौकशीसाठी बोलावले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी शुभम भोसलेने कशाप्रकारे कृती केली त्याबाबत लेखी अहवाल मी आणि बाजीराव राणे यांनी दिनांक २६/०२/२०२४ रोजी संघाकडे दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, कारवाई होणार या भितीने शुभम भोसले याने वेगवेगळया प्रकारच्या धमक्या दिल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, माझे दिनांक २३/०२/२०२४ रोजीच्या अहवालानुसार राधानगरी वाहतूक संस्थेच्या वरीष्ठांकडे संघामार्फत चौकशी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, राधानगरी वाहतूक संस्थेचा क्लर्क मनोहर कृष्णात डोंगळे याने राधानगरी वाहतूक संस्थेस शुभम भोसले व त्याने केलेल्या संगणमताबाबत लेखी जबाब दिला होता. दिनांक ११/०३/२०२४ च्या पत्रान्वये विप संघाने राधानगरी वाहतूक संस्थेस मनोहर डोंगळे विरूध्द काय कारवाई केली या बाबत विचारणा केल्याचे माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, मनोहर डोंगळे ने राधानगरी वाहतूक संस्थेस काय लिहून दिले याची माहिती विप दुध संघास होती. दिनांक १२/०३/२०२४ रोजीच्या पत्रान्वये मनोहर डोंगळे ने चौकशीमध्ये काय लिहून दिले याबाबतची माहिती विप दुध संघाकडे दिल्याचे मला माहिती नाही. दिनांक ११/०३/२०२४ आणि १२/०३/२०२४

रोजीच्या विप संघ व  राधानगरी वाहतूक संस्थेच्या पत्रव्यवहाराबाबत मी माहिती घेवून ती दाखल करू शकतो.

हे म्हणणे खरे आहे की, माझे अहवालानंतर मे. एस. व्ही.फडणीस यांच्या मार्फत अंतर्गत तपासणी करण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, मे. एस. व्ही. फडणीस यांनी वाहतूक बीलाची सखोल तपासणी करणे आवश्यक आहे असे विप संघ ाास कळवले होते. हे म्हणणे खरे आहे की, मे. एस.व्ही. फडणीस यांच्या अहवालामध्ये प्रविण देसाई आणि निलेश भोसले यांनी शुभम भोसले यांच्याशी संगणमत केल्याचा उल्लेख नाही. बीलामध्ये केलेली खाडाखोड ही केवळ शुभम भोसले यानेच केल्याचे सदरच्या अहवालात नमूद आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर श्री. गुरव यांनी वैधानीक लेखापरीक्षण केले. वैधानीक लेखा परीक्षणाचा अहवाल संघाकडे आहे. हे म्हणणे खरे आहे की, वैधानीक लेखा परीक्षण अहवालामध्ये प्रविण देसाई आणि निलेश भोसले यांनी शुभम भोसले यांच्याशी संगणमत केले असा उल्लेख नाही.

हे म्हणणे खरे आहे की, राधानगरी वाहतूक संस्थेस जादा रकमेच्या वसूलीबाबत कळवण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, राधानगरी वाहतूक संस्थेने देय रकमेतून जादा झालेली रक्कम वसूल करण्याबाबत संमती दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदार यांच्या बडतर्फ आदेशामध्ये नमूद केलेल्या रकमा या राधानगरी वाहतूक संस्थेकडून वसूल झालेल्या आहेत. जादा अदा केलेल्या रकमा राधानगरी वाहतूक संस्थेकडून वसूल झाल्यामुळे विप संघाचे आर्थिक नुकसान झाले नाही याबाबत मी सांगू शकत नाही. प्रविण देसाई आणि निलेश भोसले यांनी शुभम भोसले यांच्याशी कोणत्याही प्रकारचे संगणमत केले नव्हते याबाबत मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे

नाही की, अंतीम बील अदा करण्यापुर्वी लेखा आणि मार्केटींग विभागातील अधिकारी यांची खात्री करण्याची जबाबदारी होती. हे म्हणणे खरे नाही की, अंतीम बील अदा करण्यापुर्वी कार्यकारी संचालक, मी स्वत: त्याची खात्री करण्याची जबाबदारी होती. राधानगरी वाहतूक संस्थेच्या माहितीवरून मनोहर डोंगळे व शुभम भोसले यांनी संगणमत केल्याचे दिसून येते याबाबत मला सांगता येत नाही. सदरच्या घटनेमुळे विप संघाच्या पशुखाद्य विक्रीवर कोणताही परिणाम झाला नाही याबाबत मी सांगू शकत नाही. प्रविण देसाई आणि निलेश भोसले यांच्यावर ठेवलेला संगणमताचा आरोप चुकीचा आहे याबाबत मी सांगू शकत नाही. तक्रारदार यांच्यामुळे विप संस्थेचे आर्थिक नुकसान झाले व जनमानसातील प्रतिमेस बाधा आली असा चुकीचा आरोप केला आहे याबाबत मी सांगू शकत नाही. तक्रारदार यांचे माझे विभागाकडील सेवा काळ स्वच्छ व निष्कलंक होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे विभागापुर्वी किंवा आजतागायत त्यांना कोणतीही ताकीद अथवा नोटीस दिली नाही याबाबत मी सांगू शकत नाही. तक्रारदार यांच्या बडतर्फ आदेशामध्ये नमूद केलेली कारणे चुकीची व बेकायदेशीर आहेत याबाबत मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदार यांची सदरच्या घटनेनंतर बदली करण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, घटनेचाच एक भाग म्हणून बदली केली होती. बदली करून त्यांना शिक्षा दिली होती याबाबत मी सांगू शकत नाही. तक्रारदार यांनी कोणतेही गैरवर्तन केले नाही याबाबत मी सांगू शकत नाही. वैधानीक लेखा परीक्षण अहवाल, राधानगरी वाहतूक संस्था व विप संघ यांच्यातील पत्रव्यवहार व मनोहर डोंगळे यांचा कबूली जबाब दाखल करू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, शपथपत्रातील मजकूर अयोग्य आणि वस्तूस्थितीशी धरून नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी विप संघाला मदत

करण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.  हे म्हणणे खरे नाही की, विप संघाने दाखल कलेल्या म्हणण्यामधील मजकूर खोटा व चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

**सही/—**

कोल्हापूर.

( के. बी. कामगौडा )

दिनांकः—१३/०१/२०२६

न्यायाधीश,
कामगार न्यायालय क. २ कोल्हापूर.